**<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक ०९/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.८ वरील आदेश</u>**

आरोपी विलास सागवेकर हा अलिबाग येथील जिल्हा कारागृहात गुन्हा नोंद क्र.१९८/२०२३ च्या गुन्हयात न्यायबंदी आहे. त्याच्याविरुध्द व इतर आरोपीविरुध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. तपासिक अधिकारी आर्थिक गुन्हे शाखा रायगड अलिबाग यांनी आरोपी विलास सागवेकर यांचा हस्ताक्षर नमुना पंचांसमक्ष घेणेकरिता व आरोपी विलास सागवेकर यांची पत्नी वैशाली सागवेकर यांच्या बँक खात्यामधून आरोपी बाळु मुदाळे, यांचा भाऊ सदाशिव मुदाळे यांच्या खात्यात जमा झालेल्या रक्कमेबाबत तसेच विलास सागवेकर व त्यांची पत्नी वैशाली सागवेकर यांच्या बँक खात्यातून आरोपी बाळु मुदाळे यांचे सासरे नारायण सावंत यांच्या खात्यात जमा झालेल्या रक्कमेबाबत तसेच सदर अर्जामधील परिच्छेद क्र.४ मधील कथनांच्या अनुषंगाने तपास करण्याकरिता अटक आरोपी विलास सागवेकर याचा न्यायालयीन कोठडीत तपास करण्याकरिता परवानगी मिळणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

०२. सदरचा अर्ज वाचला. सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३११(अ) नमूद करणे आवश्यक आहे. सदर कलमानुसार पोलीस तपास करताना किंवा एखाद्या खटल्यामध्ये कोणत्याही व्यक्तीची आरोपीसह हस्ताक्षर नमूना घेण्याची आवश्यकता आहे तशी खात्री न्यायदंडाधिकारी यांना झाली तर सदर व्यक्तीचे हस्ताक्षर नमुना घेण्याबाबत न्यायदंडाधिकारी आदेश पारित करु शकतात. परंतु, सदर कलमानुसार कोणत्याही व्यक्तीचा हस्ताक्षर नमुना घेण्यासाठी त्या व्यक्तीस अटक केली गेली असणे जरुरीचे आहे. वर नमूद तरतुदीनुसार व तपासीक अधिकारी यांनी अर्जामध्ये कलम १ मध्ये नमूद

केलेली कारणे पाहता विलास सागवेकर यांचे हस्ताक्षर नमूने घेण्याची परवानगी तपासीक अधिकारी यांना परवानगी देणे न्योचित होईल.

०३. या ठिकाणी मा. दिल्ली उच्च न्यायालयाच्या **Gian Singh And Ors. vs State (Delhi Administration) And Ors 1980 SCC OnLine Del 279** या खटल्यामधील न्यायनिवाडा नमूद करणे आवश्यक आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये असे गुणोत्तर नमूद केले आहे की, एखादा आरोपी न्यायालयीन कोठडी असल्यास त्यावेळी देखील सदर आरोपी कडून तपासअधिकारी चौकशी करु शकतात. वर नमूद न्यायनिवाडयामध्ये असे नमूद केले आहे की, आरोपी न्यायालयीन कोठडीत असताना पोलीस न्यायदंडाधिकारी यांच्या परवानगीने सदर आरोपीकडे सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करु शकतात. सबब, वर नमूद न्यायनिवाडयाच्या गुणोत्तर व अर्जातील कारणे पाहता प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी विलास जगन्नाथ सागवेकर (न्यायालयीन बंदी) यांचे हस्ताक्षर नमुने पंचांसमक्ष घेण्याची परवानगी तपासीक अधिकारी यांना देण्यात येते. तसेच वर नमूद आरोपीकडे (न्यायालयीन बंदी) अर्जामध्ये नमूद कलम २ ते ४ अनुषंगाने परवानगी तपासीक अधिकारी यांना तपासणी करण्यास परवानगी देणेत येते.

२. वर नमूद प्रमाणे आरोपी विलास जगन्नाथ सागवेकर (न्यायालयीन बंदी) यांचे हस्ताक्षर नमुने पंचनामा करताना व तसेच वर नमूद आरोपीकडे (न्यायालयीन बंदी) या अर्जामध्ये नमूद कलम २ ते ४ अनुषंगाने परवानगी करिता तपासीक अधिकारी यांनी योग्य त्या कायदेशीर तरतुदींचे पालन करावे.

३. आदेशाची प्रत माहिती करिता व योग्य त्या कार्यवाही करिता अलिबाग जिल्हा कारागृह यांना पाठविण्यात यावी.

SHAIKHBABASO SIKANDAR PATIL

Digitally signed by SHAIKHBABASO SIKANDAR PATIL
Date: 2024.04.05 17:34:06 +0530

महाड

दिनांक – ०५/०४/२०२४

(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड